प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, फोर्ट, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Fort, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

नोव्हेंबर 30, 2021

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ खालील निदेश - मराठा सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र - मुदतवाढ**

भारतीय रिझर्व्ह बँकेने, निदेश डीसीबीएस.सीओ.बीएसडी-आय/डी-4/12.22.141/2016-17 दि. ऑगस्ट 31, 2016 अन्वये, दि कपोल सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना, ऑगस्ट 31, 2016 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून निदेशांखाली ठेवले होते. वरील निदेशांची वैधता वेळोवेळी वाढविण्यात आली होती व ती शेवटून नोव्हेंबर 30, 2021 पर्यंत वाढविण्यात आली होती.

(2) जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित, कलम 35 अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँक येथे निदेश देते की, निदेश डीओआर.एमओएन/डी-49/12.22.140/2021-22 दि. नोव्हेंबर 29, 2021 अन्वये वरील निदेश त्या बँकेला, पुनरावलोकनाच्या अटींवर, फेब्रुवारी 28, 2022 पर्यंत लागु असतील.

(3) संदर्भित निदेशांमधील इतर सर्व अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही. वरील मुदतवाढ अधिसूचित करणा-या दि. नोव्हेंबर 29, 2021 रोजीच्या निदेशाची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात, जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मुदतवाढीचा आणि/किंवा बदलाचा अर्थ, वरील बँकेच्या वित्तीय स्थितीबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशनी : 2021-2022/1282**